# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

http://www.dteau.org roaurangabad.dte@gmail.com

**आयएसओ ९००१-२००८ मान्यता प्राप्त**


तात्काळ/फॅक्सव्दारे

जाक्रं विकाऔ/शिक्षण/2010/ 8302

दिनांक :- 16 SEP 2010

प्रति,
प्राचार्य
शासकीय/विना-अनुदानित अभियांत्रिकी,तंत्रनिकेतन,पदवी
व पदविका औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासकांच्या संस्था
तसेच एमबीए/एमसीए अभ्यासक्रमांच्या संस्था
औरंगाबाद जिल्हा.

विषय : औरंगाबाद व्हिजन-2020 अंतर्गत निबंधस्पर्धा.

महोदय,

उपरोक्त प्रकरणी,मा.जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांच्या निर्देशानुसार व्हिजन-2020 या संकल्पने अंतर्गत औरंगाबाद जिल्हयातील एमबीए/एमसीए तसेच अभियांत्रिकी,औषधनिर्माणशास्त्र पदवी आणि पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांमधील विदयार्थ्यांसाठी एक निबंधस्पर्धा आयोजित करण्यात येत असून स्पर्धेचा तपशिल या सोबत पाठविण्यात येत आहे. निंबधस्पर्धे बाबतचा तपशिल संस्थेच्या मुख्य सूचना फलकावर देऊन या बाबत सर्व विदयार्थ्यांना अवगत करावे. व आपल्या संस्थेतील विदयार्थ्यांकडून यास योग्य प्रतिसाद मिळावा यासाठी प्रयत्न करावेत.

आपला विश्वासु,

प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद.

# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

ज्याप्रमाणे अन्न,वस्त्र,निवारा या मानवाच्या मुलभूत गरजा आहेत. त्याप्रमाणे मानव संसाधन(Human Resourcas)विकास,नैसर्गिक संसाधन(Financial Resources)या विकसनशील राष्ट्राच्या(Developing Country)मुलभूत गरजा असतात. याच दृष्टीकोनातून भारताचे माजी राष्ट्रपती आणि थोर शास्त्रज्ञ माननीय डॉ.ए.पी.जे.अबुल कलाम यांनी India Vision 2020 ही संकल्पना आपल्या राष्ट्रासमोर विषद केले होती. या अनमोल संकल्पनेचा अंगिकार केल्यास आणि त्याप्रमाणे कृती केल्यास आपल्या भारत देशाचा व जनतेचा सर्वागीन विकास होऊ शकतो. याच दृष्टीकोनातून **"औरंगाबाद व्हिजन २०२०"** ही संकल्पना विकसित करण्याचे निर्देश औरंगाबाद जिल्हयाचे मा.जिल्हाधिकारी महोदयानी दिले होते. त्या अनुषंगाने तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद या कार्यालयामार्फत खालील प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

मानवसंसाधन (Human Resources) विकास प्रक्रियेत तंत्रशिक्षणाला अनन्यसाधारण महत्व आहे. तंत्रशिक्षण विभागाच्या नियंत्रणाखाली सुशिक्षीत होणारे उदयोन्मुख अभियंता वास्तुशास्त्र,औषधनिर्माणशास्त्र इत्यादी (Engineers – Degree/ Diploma, MBA, MCA, Pharmacy Architect) याचे ही या संबंधीचे विचार व योगदान जाणून घेणे महत्वपुर्ण ठरणार आहे. यादृष्टीने या विभागातर्फे औरंगाबाद जिल्हयातील अभियांत्रिकी महाविदयालय,तंत्रनिकेतन,पदवी आणि पदविवका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासकमांच्या संस्था आणि व्यवस्थापन महाविदयालये (MBA/MCA) येथे शिक्षण घेणा-या विदयार्थ्यासाठी एक निबंध स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. या स्पर्धेचा विषय आणि तपशील खालील प्रमाणे आहे.

**निबंध स्पर्धेचा विषयः**

**१.औरंगाबाद व्हिजन २०२०**

**२.तंत्रशिक्षण २०२०**

**भाषा माध्यमः मराठी/इंग्रजी/हिंदी यापैकी कोणत्याही भाषेत निबंध लिहीता येईल.**

**शब्द मर्यादा : १००० ते १५०० शब्द** (स्वहस्ताक्षरात किंवा टंकलिखीत) कागदाच्या एकाच बाजूला लिहावे कागदाच्या डावीकडे योग्य तो समास (Margin) सोडलेले असावे निबंधामधून विचारांची सुस्पष्टता, सृजनशीलता (Creativity), प्रत्यक्ष साकार करण्यायोग्य स्वप्नमयता (Feasible dreams)उपाययोजना स्पर्धेचे स्वरुप इत्यादीचा परिचय व्हावा ही अपेक्षा आहे. निबंधाची मांडणी व भाषा प्रभावी असावी.

(अ) ही स्पर्धा संस्थास्तरावर घेतली जाईल. त्याचे वेळापत्रक खाली दिले आहे. संस्था प्रमुखांनी तज्ञ परीक्षकांमार्फत प्राप्त निबंधाचे परीक्षण करुन घेण्यात येईल. प्रथम/द्वितीय क्रमांकाला(प्रत्येक विषयवार)अनुक्रमे रु.२५१ व रु.१५१ रकमचे पारितोषिके देण्यात येतील.

(ब) प्रत्येक संस्थेमध्ये प्रथम पारितोषिक प्राप्त निबंध तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाकडे पाठविले जातील. विभागीय कार्यालयात प्राप्त झालेल्या संस्थानिहाय प्रथम पारितोषिक प्राप्त सर्व निबंधाचे तज्ञ परिक्षकांमार्फत मुल्यांकन करण्यात येईल आणि विभागीय स्तरावर गुणवत्तेनुसार गटनिहाय प्रत्येकी पाच येतील (रु.१००१, रु.७५१, रु.५५१, रु.३५१, रु.२५१)

गटः १. अभियांत्रिकी/आर्किटेक्चर/औषधनिर्माणशास्त्र महाविदयालय(पदवीस्तर)
२. तंत्रनिकेतन अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र इत्यादी(पदविकास्तर)
३. एमबीए/एमसीए महाविदयालय(पदव्युत्तर पदवी स्तर)

**स्पर्धा औरंगाबाद जिल्हयात शिकणा-या वरील शाखांच्या महाविदयालयातील विदयार्थ्यासाठीच असेल.** स्पर्धेचे वेळापत्रक (अ)संबंधित महाविदयालयाच्या विदयार्थ्यांनी त्यांच्या संस्थाप्रमुखांकडे वरील नियम व अटीप्रमाणे दोनपैकी कोणत्याही एका विषयावरचा निबंध **दिनांक ३० सप्टेंबर २०१० ते ०८ ऑक्टोबर २०१० या कालावधीत सादर करावा.visionedu2020@gmail.com** या ~~संकेतस्थळावर~~ देखिल निबंध पाठविता येतील.

संस्थाप्रमुखांनी तज्ञ परीक्षकांमार्फत निबंधाचे मुल्यांकन करण्याचा कालावधी **दि.१० ऑक्टोबर २०१० ते १८ ऑक्टोबर २०१०**

संस्थाप्रमुखांनी संस्थास्तरावरील निर्णय आणि प्रथम क्रमांकाचा निबंध विभागीय कार्यालयात सादर करण्याचा **दिनांक २० ऑक्टोबर २०१०.**

विभागीय कार्यालयाच्या स्तरावर सर्व संस्थातील निबंधांचे प्राप्त मुल्यांकन होऊन नोव्हेंबर २०१० च्या पहिल्या आठवडयात निर्णय जाहीर करण्यात येईल.खास कार्यक्रम आयोजित करुन विभागीय पुरस्कार प्राप्त निबंध लिहिणा-या विदयार्थ्याचा गौरव करण्यात येईल.

प्र.सहसचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद